



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २०९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.११ मार्च २०२५

## थोडक्यात

### उरणमधील शालेय विद्यार्थी अंमली पदार्थांच्या विळख्यात?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, उरण :** तालुक्यातील शहर आणि ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थी अंमली पदार्थांच्या विळख्यात अडकत चालला आहे. शाळा, महाविद्यालयांच्या ५०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थाची विक्री करण्यास मनाई आहे. तरीही या पदार्थांची सर्रास विक्री केली जात असल्याने अल्पवयीन शालेय विद्यार्थी नशेच्या आहारी जाऊन त्यांचे आयुष्य उद्धवस्त होत आहे. यातील अनेक विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहेत. त्यामुळे अनेक कुटुंब तणावाखाली आहेत. आपल्या व्यसनासाठी मुलांकडून घरात चोरी आणि पालकांना धमकावण्याचे प्रकार घडत आहेत. यात काही पालकांनी मुलांना दिलेले अति आर्थिक स्वातंत्र्यही कारणीभूत ठरत आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते संजय ठाकूर यांनी उरणच्या आमसभेतही आवाज उठला आहे. दरम्यान, अंमली पदार्थाच्या तस्करीचे चक्र तोडून काढण्याचा प्रयत्न असल्याचे मत पोलिसांनी व्यक्त केले आहे. तरुणांना अमली पदार्थाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी मोहीम राबविण्याचे आवाहन उरणचे आमदार महेश बालदी यांनी केले. अमली पदार्थांच्या विक्रीवर पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. उरण पोलिसांनी नुकताच एका कारवाईत गांजा जप्त केला. यापुढे देखील गांजा चरस यांचे रॅकेट तोडून काढण्याला आमचे प्रधान्य राहील अशी माहिती उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांनी दिली.

### तरुणींना बघून रस्त्यावरच केले अश्लील कृत्य...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, नागपूर :** राज्याच्या गृहमंत्र्यांच्या शहरात कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे काढणारी घटना समोर आली आहे. वर्धा मार्गावरील सुशोभिकरण केलेल्या फुटपाथवर बसलेल्या तरुणींना बघून एका युवकाने कानाला मोबाईल लावून अश्लील कृत्य केले. स्वत:ची पँट काढून तरुणींकडे बघून अश्लील इशारे केले. हा किळसवाणा प्रकार रविवारी रात्री साडेनऊ वाजताच्यासुमारास धंतोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत मध्यवर्ती कारागृहासमोरील रस्त्यावर घडला.

या प्रकरणी धंतोली पोलिसांनी गुन्हा दाखल करुन त्या विकृत मानसिकतेच्या युवकाला अटक अटक केली. वर्धा मार्गावरील अजनी चौकाकडून रहाटे कॉलनी मेट्रो स्थानकाकडे जाणाऱ्या मार्गावर हा प्रकार घडला आहे. सायंकाळच्या सुमारास फुटपाथवर तरुण-तरुण तसेच ज्येष्ठ नागरिक येऊन बसतात. रविवारी रात्री नऊ वाजताच्या सुमारास काही तरुणी फुटपाथवर लावलेल्या बेंचवर बसल्या होत्या. अचानक एक युवक त्या तरुणींसमोर आला. त्याने तरुणींनी बघून अश्लील इशारे केले. त्यानंतर त्याने पँट खाली करुन अश्लील कृत्य करायला सुरुवात केली. या प्रकारामुळे तरुणींना धक्काच बसला. त्याने तरुणींकडे पाहत चुंबन घेण्याचा इशाराही केला. सुरुवातीला त्या तरुणींनी दुर्लक्ष केले. मात्र, एकीने हिंमत दाखवत त्याचा व्हिडिओ काढला. त्यानंतर त्या युवकाला हटकले. मात्र, तो युवक अरेरावी करुन तरुणींना दमदाटी करीस अश्लील संवाद साधत होता. त्यामुळे मुलींनी पोलिसांना फोन लावण्यासाठी काही व्यक्तींची मदत घेतली. काही नागरिक मदतीसाठी आल्यामुळे त्या युवकाने तेथून पलायन केले. धंतोली पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

# संगमेश्वर येथे छत्रपती संभाजी महाराजांचं भव्य स्मारक उभारणार

# उपमुख्यमंत्री अजित पवारांची मोठी घोषणा...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांचं अरबी समुद्रात भव्य स्मारक उभारण्याची घोषणा करणाऱ्या राज्य सरकारने त्या स्मारकाच्या प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात केलेली नाही. अशातच राज्यातील महायुती सरकारने छत्रपती संभाजी महाराजांचं भव्य स्मारक उभारण्याची घोषणा केली आहे. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी आज राज्यातील नव्या सरकारचा पहिला अर्थसंकल्प सादर केला. यावेळी त्यांनी ही घोषणा केली आहे. यासह हरियाणातील पानिपत येथे मराठ्यांच्या युद्धाचं स्मारक बांधण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचंही जाहीर केलं. उत्तर प्रदेशमधील आग्रा येथे शिवाजी महाराजांचं स्मार्क उभारणार असल्याची



घोषणा अजित पवारांनी आज केली.

अजित पवार म्हणाले, छत्रपती शिवरायांनी स्थापन केलेल्या स्वराज्याच्या रक्षण आणि विस्तारासाठी जीवन समर्पित केलेल्या, असीम शौर्य आणि धैर्याने लढलेल्या, सर्व लढायांत विजयश्री मिळवणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाच्या खुणा महाराष्ट्रात जिथे आहेत, त्यात कोकणातील संगमेश्वर हे एक प्रमुख ठिकाण आहे.

औरंगजेबाच्या महाकाय सेनेशी महाराजांनी बोटावर मोजता येतील एवढ्या शूर मावळ्यांना सोबत घेऊन येथेच पराक्रमाची शर्थ केली. स्वराज्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या स्वाभिमानी राजाच्या पराक्रमाची स्मृती कायमस्वरुपी जपण्यासाठी संगमेश्वर येथे त्यांचे भव्य स्मारक उभारण्याची मी घोषणा मी करतो.

**दरवर्षी एका प्रेरणादायी गीताला 'छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणा गीत' पुरस्कार दिला जाणार**

छत्रपती संभाजी महाराजांचे पवित्र बलिदानस्थळ असलेल्या मौजे तुळापूर आणि समाधीस्थळ मौजे वढु-बुद्रुक येथे त्यांच्या भव्य स्मारकाचे काम प्रगतीपथावर असल्याची माहिती अजित पवार यांनी दिली. तसेच त्यांनी आणखी एक मोठी घोषणा केली. ते म्हणाले, दरवर्षी एका प्रेरणादायी गीताला छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणा गीत पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णयही शासनाने नुकताच घेतला आहे.

**पानिपत येथे स्मारक उभारणार...**

अजित पवार म्हणाले, स्वराज्यासाठी बलिदान देणाऱ्या लाखो मराठ्यांच्या शौर्याचे प्रतीक म्हणून हरियाणातील पानिपत येथे यथायोग्य स्मारक उभारण्याचा निर्णयही आम्ही घेतला आहे. हरियाणा शासनाच्या मदतीने या स्मारकासाठी जागा उपलब्ध करुन घेण्यात येईल.

**आग्र्यात शिवाजी महाराजांचं स्मारक उभारणार**

मुघलांच्या नजरकैदेतून आग्र्याहून सुटका हा शिवचरित्रातील प्रेरणादायी प्रसंग आहे. छत्रपती शिवाजी महाराज नजरकैदेत होते, तेथे भव्य स्मारक उभारण्याचे राज्य शासनाने ठरवले आहे. त्यासाठी उत्तर प्रदेश शासनाच्या सहकार्याने जागा उपलब्ध करुन घेण्यात येईल, अशी माहिती अजित पवार यांनी दिली.

# महायुतीच्या माध्यमातून विकासकामांची पुर्तता - आमदार काशिनाथ दाते

## मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या वतीने आमदार काशिनाथ दाते यांचा सत्कार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचे तसेच राज्याचे जलसंपदामंत्री व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे पाठबळ तसेच केंद्र सरकार व राज्य सरकार यांची सत्ता यामुळे मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकासकामे होणार असल्याची ग्वाही आमदार काशिनाथ दाते यांनी दिली आहे. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या वतीने त्यांचा ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंत कवाद यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी ते बोलत होते. यावेळी बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव थोरात, माजी सरपंच ठकारामशेठ लंके,




निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत लामखडे, माजी चेअरमन रामदासशेठ वरखडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे कोषाध्यक्ष व मळगंगा कंट्रक्शनचे अध्यक्ष अमृताशेठ रसाळ, सचिव शांताराम कळसकर, राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या महिला आघाडीच्या जिल्हा कार्याध्यक्षा सुधामती कवाद, संपदा सहकारी पतसंस्थेचे चेअरमन शिवाजी वराळ, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष ॲड.बाळासाहेब लामखडे यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार दाते म्हणाले निघोज ग्रामीण संस्था परिवाराचे संस्थापक अध्यक्ष व ज्येष्ठ नेते स्व. बाबासाहेब कवाद यांचे विचार समाजासाठी प्रेरणादायी होते. आपण आमदार होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले मात्र उमेदवारी मिळू शकली नाही. सहकारी पतसंस्था चळवळ बळकट करण्यासाठी आपण प्रयत्नशील असून जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरात होत असलेल्या कामांसाठी निधी उपलब्ध करून निघोज व परिसरात विकासकामे करण्यासाठी आपण पाठपुरावा करणार असल्याचे दाते यांनी सांगितले.

# माढा पंढरपूर आणि सोलापूरसाठी निराशाजनक अर्थसंकल्प : आ.अभिजीत पाटील

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१०, पंढरपूर :** सोलापूर जिल्ह्याने महायुतीला कमी मतदान केले असले तरीही येथील जनता महाराष्ट्राचीच जनता आहे. पहिल्याच अर्थसंकल्पात हा दुजाभाव दिसेल, अशी अपेक्षा नव्हती! राजकारण हे फक्त निवडणुकीपुरते असते, सरकार चालवताना संपूर्ण राज्याचा विचार व्हावा लागतो. मा.अजितदादा पवार असा पक्षपात करणार नाही, अशी अपेक्षा होती. पण युतीचा प्रभाव त्यांच्या अर्थसंकल्पीय मांडणीतही दिसून आला का, असा प्रश्न पडतो. युतीने विकासापासून अशी वंचित ठेवलेली जनता पुढच्या वेळी मतदान करेल, की प्रक्षोभ वाढेल? हे वेळच ठरवेल! महाराष्ट्राच्या दृष्टीने देखील हा एक फसवणुकीचा आणि दिशाभुलीचा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी दिली

**शेतकरी कर्जमाफी विषयीची फसवणूक!**

शेतकऱ्यांना मोठ्या आशा दाखवल्या पण प्रत्यक्षात कर्जमाफी मिळालेली नाही. लाडक्या बहिणींची फसवणूक! लाडक्या बहिणींना २१०० देण्याचे आश्वासन निवडणुकीत दिले.




प्रत्यक्षात मात्र काहीच नाही.

**महत्त्वाचे प्रकल्प ठप्प!**

सोलापूर विमानतळ, पंढरपूर विठ्ठल मंदिर समिती। सीना-माढा उपसा सिंचन प्रकल्प। ग्रामीण भागातील रस्ते, डीपी आणि वीजपुरवठा यासंदर्भात तकलादू धोरण इतिहास घडवणाऱ्या महापुरुषांच्या स्मारकांसाठी निधी नाही!

अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासाठी कोणतीही तरतूद नाही. आधी नुसतेच भूमिपूजन करून ठेवले.अहिल्यादेवी होळकर स्मारकासाठी निधीची तरतूद नाही! त्यांचे ३०० व्या जयंती वर्षानिमित्त स्मारकाची घोषणा होईल असे अपेक्षित होते. पण त्या मागणीकडेही दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. फक्त जुन्या रस्त्यांचे डागडुजी, नवीन रस्त्यांना निधी नाही! हे अत्यंत खेदजनक आहे. लोकप्रिय योजनांच्या घोषणांमुळे निवडणुकीत आश्वासने देता येत असली तरी पायाभूत सुविधांसाठी त्यामुळे निधी शिल्लक राहिला नाही असे चित्र आहे. राज्य सरकारने सादर केलेला ₹४८,००० कोटींच्या तुटीचा अर्थसंकल्प आहे.

सरकारकडे नवीन विकास प्रकल्पांसाठी निधी नाही, आणि इलेक्शनच्या आधीच तिजोरी रिकामी केली आहे! नियोजना अभावी हे सरकार पुढील पाच वर्षांत कोणतेही महत्त्वाचे कार्य करू शकत नाही, हेच या अर्थसंकल्पातून स्पष्ट होताना दिसत असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे.

# माझी बॉडी विहिरीतून काढून घ्याल,चा मेसेज पाठवल्यानंतर अभियंत्याने मृत्यूला कवटाळले

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, बुलडाणा :** खामगाव तालुक्यातून अतिशय धक्कादायक आणि काळीज पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. अभियंता असलेल्या युवकाने, आपल्या भावाला मोबाईलवर शेवटचा मेसेज पाठवून आत्महत्या केली. विहिरीतून त्याचा मृतदेह बाहेर काढल्यानंतर त्याच्या माता पित्याचा आक्रोश, नातवाईकांचे रुदन आणि महिलांनी फोडलेले हंबरडे याने, वातावरण शोकाकुल झाले. गावावर शोककळा पसरलीखामगाव तालुक्यातील बोरी अडगाव आणि अटाळी शिवारात हा हृदयद्रावक घटनाक्रम घडला. बोरी अडगाव येथील विनायक टिकार यांचा रामरतन विनायक टिकार हा एकुलता एक मुलगा. त्याला कश्यातच कमी पडू न देता उच्च शिक्षित केले, अभियंता केले. त्याला लवकरच 'जॉब' देखील लागला. आयटी क्षेत्रात आघाडीवर असलेल्या बेंगलोर मध्ये काम सुरु केले. कालांतराने कंपनीने त्याला घरून काम ( वर्क फ्रॉम होम ) ची परवानगी सुद्धा दिली. यामुळे रामरतन टिकार हा आपल्या गावात परतला आणि घरूनच काम करू लागला. असे सारे काही सुरळीत असताना आणि एकुलता एक वारसदार असताना रामरतन मात्र मनातल्या मनात नाराज होता, मनाशी खात होता. आपण अपयशी आहोत, असफल ठरलो असा पक्का समज त्याने करून घेतला होता. 'आधी मेसेज मग सुसाईड'

याच कथित वैफल्यातून रामरतन टिकार याने आत्महत्येचा शेवटचा पर्याय निवडला. मात्र त्यापूर्वी त्याने आपला चुलत भाऊ असलेल्या सुधीर विश्वास टिकार (वय ४२, राहणार वंदना नगर वाडी )याला मोबाईल ने शेवटचा संदेश पाठविला. ' मला चांगली नोकरी लागत नसल्यामुळे पाहिजे तसे यश प्राप्त झाले नाही, तुम्ही सकाळी येऊन माझी बॉडी विहिरीतून काढून घ्या 'असा तो संदेश होता. यामुळे हादरलेल्या सुधीर आणि त्याच्या काकांनी अटाळी शिवारातील शेत गाठले. त्या विहिरीत रामरतन चा मृतदेह आढळून आला. याची माहिती सर्वत्र पसरताच इतर नातेवाईक आणि गावकरी यांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी महिलांचे रुदन, हंबरडे आणि सोयऱ्यांचा आक्रोश याने वातावरण शोकाकुल झाले. एकुलत्या एक लेकाने आत्महत्या केल्याने टिकार दाम्पत्यावर मोठे संकट कोसळले आहे.

प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १९४ नुसार घटनेची नोंद केली आहे. पोलीस हवालदार बाळकृष्ण फुंडकर या दुर्दैवी घटनेचा तपास करीत आहे.




## बाळा, येऊन एकदा भेट रे!

सोशल मीडियावर एक अतिशय भावनिक व वेदनादायी व्हिडिओ पाहिला.वृध्दाश्रमात कुंठित जीवन जगणारा एक बाप वृध्दाश्रमातील एका कार्यक्रमात बोलताना आपल्या मुलाला हाक मारत आहे आणि अंतरीच्या वेदना जग जाहीर करत आहे.तो बाप आपल्या मुलाला कवितेच्या माध्यमातून अतिशय भावनिक साद घालताना म्हणतो,'बाळा वृध्दाश्रमात येऊन मला एकदा भेट रे,येथे जीव गुदमरतो मला घरी घेऊन जा रे!'

हा व्हिडिओ पाहताना अंगावर शहारे येतात आणि मनाला अतिव वेदना देऊन जातात.वृध्दाश्रमातील एका वडिलांची ही आर्त हाक मन बधीर करते,रक्त गोठवते,हृदयाला भेगा पाडते आणि माणसा तू माणूसच आहेस ना?असा प्रश्न विचारते!

मागचा पुढचा विचार न करता आणि पत्नीच्या आहारी जाऊन आपल्या आईवडिलांना वृद्धाश्रमात ठेवणाऱ्या मुलांनी एवढे निर्दयी का बनावे?आपल्या आईवडिलांना वृध्दाश्रमात ठेवून आपण आनंदाने जीवन जगूच शकत नाही.म्हणून तुम्ही तुमच्या पत्नीला समजावून सांगा की,हे बघ बाई मी काही आकाशातून अलगद पडलेला प्राणी नाही.माझ्या आईवडिलांनी मला लाडाकोडात वाढवले आहे, मोठ्या कष्टाने मला माझ्या पायावर उभे केले आहे.आपले हे सगळे वैभव केवळ त्यांच्यामुळे निर्माण झाले आहे.मी त्यांना वृध्दाश्रमात पाठवू शकत नाही.पत्नीला असे ठणकावून सांगा.हे ऐकून सुध्दा ती हट्ट करत असेल आणि स्वतःच्या विचारांवर ठाम असेल तर मग तुम्ही तुमच्या पत्नीला समजावून सांगा की,मॅडम तुम्हाला तुमचे आईवडील जेवढे प्यारे आहेत तसेच माझे आईवडील

सुध्दा मला प्रिय आहेत.काहीही झाले तरी मी माझ्या आईवडिलांना वृद्धाश्रमात पाठवणार नाही.जर तुम्ही तुमच्या पत्नीला एवढे ठणकावून सांगू शकत नसाल तर मग तुम्ही भेदरट आहात,तुमच्या जीवनाला काही अर्थ नाही!वृध्द आईवडिलांना तुम्ही सांभाळू शकत नसाल तर मग भविष्यात तुमच्यावर सुध्दा तीच वेळ येणार आहे हे लक्षात घ्या.जैसी करणी वैसी भरणी हे उगाच म्हटले जात नाही हे लक्षात ठेवा.

स्वतःला उच्चभ्रू,उच्चशिक्षित आणि हायफाय समजणाऱ्या लोकांच्या आदर्श सोसायटीच्या गार्डनमध्ये एकेदिवशी मी मॉर्निंग वॉकला गेलो होतो.तेथे आलेल्या व्यक्तींपैकी काही गार्डनमध्ये फिरत होते,काही लोक ओपन जीममध्ये घाम गाळत होते आणि वृद्ध स्त्रिया व वृद्ध पुरुष एका बाजूला बसले होते.त्यातील दोन स्त्रिया चर्चा करत होत्या.त्यातील एक स्त्री आवाज वाढवून म्हणाली,'आमचं नशीबच फुटके आहे.चार चार मुले असूनही आम्हाला म्हातारपणात सुख नाही.सुनांना आम्ही सासू सासरे सहन होत नाही आणि आमची बाईलवेडे मुले आमच्याशी मनमोकळे बोलत नाहीत.आमच्या वाटण्या करून टाकल्या त्यांनी. सुनांच्या धाकात राहावे लागते आम्हाला.इथे बसू नका तेथे बसा हे नेहमी ऐकून घ्यावे लागते.'

हे ऐकून आजकालच्या लोकांच्या विचित्र मानसिकतेची जाणीव झाली.धकाधकीच्या जीवनात माणूस किती स्वार्थी आणि अहंकारी झाला आहे याची प्रचीती आली.आजच्या काही सुनांना सासू सासऱ्याचा सांभाळ का करू वाटत नसेल?हे न उलगडणारे कोडे आहे.गंमत अशी की या सुनांना त्यांच्या भावांनी मात्र आईवडिलांना जीवापाड सांभाळलेच पाहिजे अशी मानसिकता असते! म्हणजे आपण कसेही वागले तरीही चालते पण दुसऱ्यांनी मात्र नेक व चांगले वागलेच पाहिजे.वाह रे विकृत मानसिकता!शहरात व महानगरात कुटुंबासह राहणाऱ्या मुलांकडे गावाकडे राहणारे आईवडील आले की सुनांवर आभाळ कोसळते. हिरवेगार तोंड करून त्या भांड्यांची आदळ आपटे करतात. याच सुना मात्र स्वतःचे आईवडील आल्यावर आनंदी चेहऱ्याने घरात वावरतात.सण उत्सव असल्यासारखे जेवायला गोडधोड पदार्थ बनवतात.सुनांची ही विचित्र मानसिकता कधी कायमचे संपणार आहे की नाही?खरेतर सासू सासऱ्यांचा सांभाळ न करणाऱ्या सुना हा मानवजातीला लागलेला कलंक आहे.हा कलंक धुवून पुसून टाकायचा असेल तर वृध्द आईवडिलांच्या मुलांनी खंबीरपणे आपल्या आईवडिलांना जीवापाड सांभाळलेच पाहिजे.वृध्दाश्रमात ठेवलेल्या आईवडिलांना तात्काळ घरी आणले पाहिजे.जर पत्नी आईवडिलांसोबत माणुसकीने वागत नसेल तर तुम्ही तिला सन्मानाने तिच्या माहेरी पाठवा. तुमच्या आईवडिलांसोबत नीट माणुसकीने न वागणारी पत्नी भविष्यात तुमच्यासोबत नीट राहील याची शाश्वती देता येत नाही.आईवडील आपले दैवत असतात,हे सुंदर जग आपण त्यांच्यामुळेच पाहत असतो हे नेहमी लक्षात ठेवा पोरांनो! आईवडिलांचा सांभाळ करणे आपल्या सर्वांचे ते कर्तव्यच आहे.

# चॅम्पियन्स ऑफ चॅम्पियन!

९ मार्च २०२५ ही तारीख भारतीय क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदली गेली आहे कारण या दिवशी मिनी वर्ल्डकप म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने न्युझीलंड संघावर चार गडी राखून विजय मिळवत चॅम्पियन्स ट्रॉफीवर तिसऱ्यांदा भारताचे नाव कोरून इतिहास घडवला. यावेळची चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा पाकिस्तान आणि दुबई या देशात खेळली गेली. या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत सुरुवातीपासूनच भारत विजेतपदाचा प्रबळ दावेदार होता. काहीही करून यावेळी संघाला चॅम्पियन करायचेच अशी खूणगाठ कर्णधार रोहित शर्मा आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी बांधली होती. विश्व कसोटी चॅम्पियन स्पर्धेत (wtc) भारतीय संघाला अंतिम फेरीत पोहाचवण्यास आलेले आल्यास अपयश आणि ऑस्ट्रेलिया विरुद्ध झालेल्या कसोटी मालिकेतील पराभव विसरून त्यांनी नव्याने सुरुवात केली. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत कोणते खेळाडू हवेत याचा पक्का विचार रोहित शर्माच्या मनात होता. त्याने निवड समितीकडून त्याला हवे ते खेळाडू घेतले. दुबईतील खेळपट्टी फिरकीला अनुकूल असल्याने त्याने पाच फिरकी गोलंदाजांना संघात घेतले त्यातील रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती या चार फिरकी गोलंदाजांना त्याने अंतिम अकरा मध्ये खेळवले आणि चारही फिरकी गोलंदाजांनी त्यांच्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवत अप्रतिम कामगिरी केली. या चौघांना जगातील सर्वोत्तम वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी, हार्दिक पांड्या आणि हर्षित राणा यांनी सुरेख साथ दिली. भारताची गोलंदाजी या स्पर्धेतील सर्वोत्तम गोलंदाजी ठरली. ज्या ज्या वेळी सामना भारताच्या हातातून निसटला असे वाटत होते त्या त्या वेळी गोलंदाजांनी संघाला विजय मिळवून दिला. अंतिम फेरीतही भारताच्या सर्व गोलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली. रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती चारही फिरकी गोलंदाजांनी भेदक गोलंदाजी करून न्यूझीलंडच्या फलंदाजांना जेरीस आणले. त्यांना मोहम्मद शमी आणि हार्दिक पांड्या ने सुरेख साथ दिल्याने भारताने न्युझीलंड संघाला अवघ्या २५१ धावात रोखले. न्युझीलंड संघाने डावाची सुरुवात तर धमाकेदार केली पण रचीन रवींद्र आणि केन विल्यम्सन हे त्यांचे




भरावशाचे फलंदाज बाद झाल्यावर भारताच्या फिरकी गोलंदाजांनी फास आवळला आणि न्यूझीलंडच्या फलंदाजांना वेसण घातली त्याचा परिणाम असा झाला की त्रिशतकी मजल मारणारा न्युझीलंडचा संघ २५१ धावाच करू शकला. न्युझीलंड संघाला २५१ धावांवर रोखून भारताने अर्धी लढाई जिंकली. केवळ गोलंदाजांनीच नव्हे तर फलंदाजांनीही छान कामगिरी केली. भारताचा कर्णधार रोहित शर्मा याने ७४ धावांची धडाकेबाज खेळी केली. त्याने आणि शुभमन गीलने शतकी सलामी देऊन विजयाचा पाया रचला. रोहित शर्मा हाच अंतिम सामन्याचा मानकरी ठरला. विराट कोहली स्वस्तात बाद झाला तरी श्रेयस अय्यर, अक्षर पटेल आणि हार्दिक पांड्या यांनी भारताला विजयी केले. अंतिम सामन्यातच नव्हे तर संपूर्ण स्पर्धेत भारताच्या गोलंदाज आणि फलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली . या स्पर्धेत भारताचे क्षेत्ररक्षणही अप्रतिम होते. एकूणच गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा तिन्ही आघाड्यांवर भारताने अप्रतिम कामगिरी करीत हे विजेतपद मिळवले. रोहित शर्माने संघाचे कर्णधारपद अतिशय कुशलतेने सांभाळले. या विजतेपदात जितका खेळाडूंचा वाटा आहे तितकाच सपोर्ट स्टाफचाही आहे. प्रशिक्षक गौतम गंभीर आणि त्यांच्या टीमने पडद्यामागे मोठी कामगिरी बजावली त्यामुळेच भारत पुन्हा एकदा आयसीसीच्या स्पर्धेत विजेता बनला. भारतीय संघाचे हे विजेतपद खास आहे कारण भारतीय संघाचे हे तिसरे चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतपद आहे. २००२ साली भारताने श्रीलंके सोबत संयुक्त विजेतेपद मिळवले होते. तेंव्हा भारताचा कर्णधार सौरभ गांगुली हा होता . त्यानंतर २०१३ साली महेंद्रसिंग धोनी कर्णधार असताना भारताने इंग्लंडला हरवून दुसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती त्यानंतर बारा वर्षानंतर भारतीय संघाने या स्पर्धेचे विजेतपद मिळवले आहे. तीनदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणारा भारत हा पहिला देश आहे. त्यामुळेच भारतासाठी हे विजेतपद ऐतिहासिक आहे. तीनदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकून भारताने आम्हीच चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स आहोत हे जगाला दाखवून दिले. हे विजेतपद मिळवून भारतीय संघाने क्रिकेट विश्वावर आपली हुकूमत पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. कारण आयसीसीच्या सलग तीन स्पर्धेत भारताने अंतिम फेरी गाठली त्यात भारताला दोनदा विजेतपद मिळवण्यात यश मिळाले. फक्त एकदाच भारताला अंतिम फेरीत पराभव स्वीकारावा लागला तो २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलिया कडून मात्र त्यानंतर मागील वर्षी टी २० विश्वचषक स्पर्धेत भारताने दक्षिण आफ्रिकेला हरवून विश्व विजेतपद मिळवले होते आणि आता चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचे विजेतपद मिळवून भारताने क्रिकेट विश्वातील आपली मक्तेदारी सिद्ध करून आपणच क्रिकेट मधील सर्वोत्तम संघ आहोत हे जगाला दाखवून दिले आहे. तिसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतपद मिळवणाऱ्या चॅम्पियन्स भारतीय संघाचे हार्दिक हार्दिक अभिनंदन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# राष्ट्रस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५

**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.१०, ठाणे (नवी मुंबई) :** ९ मार्च २०२५ रोजी कराडी समाज हॉल, कामोठे येथे पुरस्कार सोहळा आयोजित केला होता. गणित आणि विज्ञान विषयातील १० शिक्षकांचा ग्लोबल गोल्ड टैलेंट बुक ऑफ रेकॉर्ड नवी मुंबई यांच्यातर्फे शैक्षणिक क्षेत्रातील, त्यांच्या उत्कृष्ट कार्यासाठी, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सत्कारमूर्ती विजय वाघेला (सेंट लॉरेन्स स्कूल, अंधेरी), स्नेहा निनाद कर्णिक (सेंट जोसेफ स्कूल मालाड, मुंबई), पूनम अनिकेत दिक्षित (न. जी वर्तक स्कूल, विरार), ज्योती सनाये(लेडी इंजीनियर हायस्कूल ताडदेव), सतीश मिश्रा (द आंध्र एजुकेशन सोसायटी हायस्कूल),



नसीम नजीरहुसेन कुरणे (रा.फ.नाईक विद्यालय, कोपरखैरणे), यांना मुंबई डिव्हिजनल बोर्ड येथील उत्कृष्ट कामगिरी आणि त्यांच्या गणित आणि विज्ञान विषयातील प्राविण्यामुळे ट्रॉफी, मेडल आणि सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले. सोनाली भालेकर(श्री सिद्धिविनायक इंग्लिश स्कूल) काजल सुर्वे (सेंट चार्ल्स हाई स्कूल, सांताक्रुझ पूर्व) साक्षी भोईटे, सुजाता सूर्यवंशी ह्या नवोदित शिक्षकांचा पण सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्याचे प्रमुख आयोजक आणि संचालिका मेघा श्रीराम महाजन, मुख्य अतिथी पद्मश्री पुरस्कृत अभिनेत्री नयना आपटे, सहायक पोलिस निरीक्षक रत्ना रामस्वरूप खंडेलवाल, अँटी पायरसी सेल प्रमुख रामजीत गुप्ता उपस्थित होते. सत्कारमूर्तींचे पालक, विद्यार्थी समाज आणि सर्व स्तरातील लोकांकडून कौतुक होत आहे. वरील १० सत्कारमूर्तींना पुढील वाटचाली साठी हार्दिक शुभेच्छा.

## चषक आपला..




स्वप्नांची स्वयंपूर्णता
विश्व चषक आपला
चक दे इंडिया नारा
क्रिडाजगते व्यापला

अप्रतिम खेळ करी
गाजवी खेळशृंखला
स्मरणातअटीतटीचा
अंतीसामनाजिंकला

अशी द्यायची झुंज रे
रसिका देती दाखला
चक्रव्यूह डावपेच ते
दूरदर्शी पथ आखला

भल्यादिग्गजसंघाचा
प्रयासे वारु रोखला
हम किसेसे कम नहीं
तिरंगासन्मानराखला

दीडदशक प्रतिक्षेतले
सूर्य अंमळ झाकला
ढगांचे आवरण नश्वर
प्रकाश जगी फाकला

कसेकरावे अभिनंदन
शब्दकोषही थबकला
ज्ञात अज्ञात कैकजण
धन्यवाद द्यावे सकला

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# चांगल्यांना टोचण्या जास्त असतात...

**मुर्खाच्या आवेशात**
**वेश काय बदलता**
**तुमचे ते वर्तन नव्हे**
**शहाणे समजत होतो**
**उगाच म्हणत होतो.**
**तुम्ही तर त्यातलेच**
**एवढे आतले वाटले नव्हते**
**दुष्काळी सदा-**
**सुकाळी कधीच नव्हते...**

या पंक्ती उगाच सुचल्या म्हणून नाहीत तर समाजातला एक मोठा आकडा असाच आहे. ज्यांना चुका काढण्यात आणि त्या आवर्जून सर्वांपुढे दाखवण्याची भारी हौस असते. चूक असेल तर सांगावी; आणि तीही खाजगीत, सार्वजनिक माहौल करण्यात कसली आली मजा! इथे तिथे कायम 'उठ हशा' करण्यात जिंदगी संपत आहे याची जाणीव संपता संपता तरी व्हायलाच हवी. चांगली माणसे आणि चांगली कर्मे सध्या दुर्मिळ होत असण्याचे मुळात कारण हेच आहे. कारण कौतुक म्हणून काही नाही तर नाहीच त्याशिवाय काटेरी कुंपणात काटे खुपसणारेच जास्त होवू पाहत आहेत. आपले दुःख ते आपले आणि आपले सख्ये ते पक्के! बाकीच्यांचे काय? सगळी मोजणी उघड्यावरच आणखी किती दिवस आणि का म्हणून करायची? बरं, काही उसनवारी पण नाही फेडत बसायला. चांगुलपणाचा टेंबा मिरवायचा आहे म्हणून चांगल्याचाच जीव घेणे हे किती योग्य आहे? अयोग्याला योग्य म्हणण्यात काही अर्थ तर नाहीच शिवाय स्वतःच मिशी ताणून व फुटलेले पोट आणखी फुगवून आपलीच मर्दुमकी गाजवात बसायची. चांगल्यात एक दुर्गुण असतो; की तो खूप चांगला असतो. त्याचा फायदा ही सो कॉल्ड जमात घेताना दिसत आहे. तुम्ही दारू पिवून रस्त्यावर लोळा, तुम्हाला कोणी काहीच म्हणणार नाही. तुम्ही पाकीट मारा की डाका टाका- तुमच्याकडे लक्ष



पण देणार नाही. कारण ही लक्ष्याधिष्टीत म्हणवली गेलेली माणसे याकडे लक्ष देणारी नसतात; कारण ती चांगली नसतात. अशा लोकांच्या वाट्याला जाण्यापेक्षा त्यांची वाट सुकर करणारे भरपूर आहेत आणि ते करत असताना दुर्गुणपणा आपण झाकतोय याची लाज अजिबात कोणालाही वाटत नाही. पण चांगल्यात लाथा मारून पाणी काढल्यागत आव आणणारे कित्येक आहेत.

नियमांवर बोट ठेवून पण कामे सध्या भरपूर होत आहेत. तरीसुद्धा हे भरपूर नियम काहीनांच लागू आहेत. आपली बिशाद जर खरेच कठोर असेल तर कठोर हवीच पण नियम म्हणजे सर्वांना सारखे व सर्वांना लागू तसे तुम्हीही लावून घ्या. नाहीतर लावून-लावून चांगल्यांनाच खायचं आणि दुसऱ्यांना मात्र ओसरीपर्यंत पसरू द्यायचं, हे काही बरोबर नाही.

जग सुधारविणारे आधीही होते आणि आताही आहेत. रोखणारे पण आधीही होते आणि.. पण, हे काही थांबले नाही. मग जिथे चवीला तुम्ही तिखटही होऊ शकत नाही तिथं बेचव तरी कशाला करताय. कोणाला टोमणा म्हणून लिहिणे नाही तर कोणाला काहीतरी बरे दिसत नाही म्हणून लिहिणे. आपल्याने बदल होत असेल तर करावा. तो तुमच्या दृष्टीने चांगलाच असेल पण आपले अनुयायी किती? हे पाहून करावा. नाहीतर चारजण मागे म्हणून हजारोच्या नेतृत्वाला टशन देत बसू नाही.

स्तुत्य काम करणारे करत राहणार; कारण त्यांच्यात पण एक किडा आहे चांगले काम करण्याचा. तो मरत तर नाहीच पण जगत असताना सरत तर कसाच नाही. तिथे आपली हालचाल ही व्यर्थ घालण्यापेक्षा शरीराच्या हालचालीत (व्यायायामात) घातली तर उत्तमच. शरीर सुदृढ व्हावे म्हणून तर अजिबात नाही तर रक्ताभिसरण सुधारून बुद्धी तल्लख व्हावी म्हणून!

कारण नाही म्हणले तरी मनाच्या जवळ मेंदूच असतो. इथल्या गाठी आडकाठी आणत असताना आपण स्वस्थ बसूच नये. बाकी समजणारे समजतील आणि न समजणारे पसरतील.

**वसा हा वसाच असतो**
**तो असा तसा नसतो**
**डोंगर आडवे करणारे**
**पसरट्यांना पसरत नाहीत.**
**पाणी खूप आतवर आहे आपल्या**
**तिथे वर-**
**वरवरच्यानांना दिसत नाही...**

**लेखक - अमोल चंद्रशेखर भारती,**
**नांदेड मो.८८०६७२१२०६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## स्पार्क प्रकल्पा अंतर्गत रायपूर येथे सौरऊर्जा शेती पंपाचे उद्घाटन संपन्न



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१०, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील पूर्वेकडील आदिवासी ग्रामीण भागातील रायपूर येथे सौर जल पंपाचे करून कृषी विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले. टीएनएस इंडिया फाउंडेशन आणि एम.अँड.जी ग्लोबल सर्व्हिसेसच्या सहकार्याने हा उपक्रम स्थानिक शेतकऱ्यांना शाश्वत सिंचन उपाय प्रदान करण्याचे उद्दिष्ट ठेवतो. यामुळे येथील स्थानिक शेतकऱ्यांचा उन्हाळी पाण्याचा प्रश्न मिटला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन रायपूर येथे सोमवार, दिनांक १० मार्च २०२५ रोजी करण्यात आले. या उद्घाटन समारंभाला वन विभाग, कृषी विज्ञान केंद्र, कोसबाड, डहाणूचे पंचायत सभापती, एम.अँड.जी ग्लोबल सर्व्हिसेस आणि टीएनएस इंडिया फाउंडेशनचे प्रतिनिधी आणि रायपूरचे ग्रामपंचायत सरपंच यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. नव्याने बसवण्यात आलेल्या सौर जल पंपामुळे रायपूरमधील १२ शेतकऱ्यांच्या गटाला फायदा होईल. ज्यामुळे त्यांना त्यांच्या शेतीच्या जमिनीवर प्रभावीपणे सिंचन करता येईल. हा प्रकल्प टीएनएस इंडिया फाउंडेशनच्या व्यापक उपक्रमाचा एक भाग आहे. ज्याने व्यापक स्थानिक क्षेत्र विकासासाठी रायपूर ग्रामपंचायत स्वीकारली आहे. फाउंडेशनचे प्रयत्न जलसंपत्ती विकास, शेती वाढ आणि महिलांचे जीवनमान सुधारणे यासारख्या प्रमुख हस्तक्षेपांवर केंद्रित आहेत.

शेजारच्या तीन गावांतील शेतकऱ्यांनी या कार्यक्रमात भाग घेतला. ज्यामुळे या शाश्वत उपायासाठी समुदायाचा उत्साह अधोरेखित झाला. प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीचे श्रेय स्थानिक परिवर्तन सौर पंप पाणी वापरकर्ता गट आणि भूमी महिला शेतकरी गटाच्या समर्पित प्रयत्नांना देण्यात आले. या सौर जल पंपमुळे या प्रदेशातील कृषी उत्पादकता लक्षणीयरीत्या सुधारेल, ज्यामुळे एक विश्वासार्ह आणि पर्यावरणपूरक सिंचन व्यवस्था मिळेल अशी अपेक्षा आहे. हा प्रकल्प शाश्वत विकासासाठी एक मॉडेल म्हणून काम करतो, जो संस्था आणि स्थानिक समुदायांमधील सहयोगी प्रयत्नांचा सकारात्मक परिणाम दर्शवितो.

## शेतकऱ्यांच्या समर्थनार्थ २ हजारांवर स्पर्धक धावले



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, अहिल्यानगर :** शेतकरी व आरोग्याच्या समर्थनार्थ खासदार निलेश लंके प्रतिष्ठानने रविवार, दिनांक ०९ मार्च २०२५ रोजी आयोजित केलेल्या मॅरेथॉन स्पर्धेत २ हजारांवर स्पर्धकांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन खासदार निलेश लंके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे (ठाकरे गट) जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती बाळासाहेब हराळ यांच्यासह नगर दक्षिण मतदारसंघातील विविध मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेमध्ये दृष्टीहीन दिव्यांग, लहान मुले, तरुण नागरिक, शेतकरी यांच्यासह लष्कराच्या ४३ जवानांनी सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे ७० वर्षांच्या आजीही नऊवारी साडीत धावल्या. यावेळी बोलताना खासदार निलेश लंके म्हणाले, ही केवळ धावण्याची स्पर्धा नाहीतर शेतकरी व आरोग्यसेवेच्या समर्थनार्थ सुरू केलेला हा उपक्रम आहे. समाजाने शेतकऱ्यांचे योगदान समजून घेतले पाहिजे. त्यांच्या सन्मानासाठी पुढे यायला हवे प्रा शशिकांत गाडे म्हणाले, आजपर्यंत आपण अनेक मॅरेथॉन स्पर्धा पाहिल्या, मात्र शेतकऱ्यांच्या समर्थनार्थ शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी त्यांच्या पाठीशी उभे राहण्यासाठी ही स्पर्धा आहे. याचा संदेश देण्यासाठी स्पर्धा उपयुक्त असल्याचे गाडे यांनी सांगितले.

## मनसे माजी आमदार राजू पाटील यांच्या मागणीला यश



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१०, दिवा (ठाणे) :** शिळ- दिवा मार्गावर खाडी पुलाजवळ नवीन पूल बांधण्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे आमदार राजू पाटील यांनी मागणी केली होती. यासाठी त्यांनी ६ कोटींची निधीची मागणी केली होती. त्यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. तसेच मनसे विभाग अध्यक्ष शरद पाटील यांनी सुद्धा मागणी केली होती. कल्याण ग्रामीण मतदारसंघातील शिळ-दिवा पूल अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळे या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात रहदारी सुरु असते. सध्या अस्तित्वात असलेले पुल अत्यंत अरुंद असल्यामुळे नाबार्ड अंतर्गत शिळ दिवा खाडीवर नवीन पुलाला मंजूरी द्यावी आणि निधी द्यावे. यासाठी मनसे माजी आमदार पाटील यांनी मागणी केली होती. त्या मागणीला आता यश आले आहे.

## पाचलकर कुळ परिवार स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम पार संपन्न

**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.०९, ठाणे :** दिनांक ०९ मार्च २०२५ रोजी डहाणू तालुक्यातील कैनाड दौडपाडा येथे पाचलकर कुळ परिवार स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम पार पडला. या १४ व्या स्नेहसंमेलनाला सिलवसा, खानवेल, डहाणु, शहापुर, वाडा, पालघर, वसई येथील पाचलकर कुटुंबीयांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. सकाळी १० वाजता दिपप्रज्वलन झाले. अध्यक्ष पदाची धुरा राजेश पालकर (मु.कोचाई) यांनी सांभाळली. कार्यक्रमात पाहुण्यांचे स्वागत केले. प्रमुख वक्ते आणि मान्यवर सोनु पाचलकर, रमेश पाचलकर, सिताराम पाचलकर, वासुदेव पाचलकर, गोपाळ पाचलकर, मारुती पाचलकर, सुरेश पाचलकर,सत्या पाचलकर,नविन पाचलकर,सचिन पाचलकर,मंगला पाचलकर,मालती पाचलकर,युट्युब कलाकार सारीका पाचलकर उपस्थित होते. सिलवास ते खानवेल ,डहाणु-पालघर ते वाडा आणि शहापुर ते वसई पर्यतच्यार्यतच्या पाचलकर बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रविण पालकर आणी गोपाळ पाचलकर यांनी केले.स्नेहभोजनानंतर पाचलकर कुटुंबीयांनी प्रेरणादायी भाषणांनी रंगत भरली आणि सांस्कृतिक कार्यक्रम, एकमेकांच्या गाठीभेटी घेत आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाचे पाचलकर परिवाराच्या एक्याचेक्याचे आणि एकोप्याचे दर्शन घडवत स्नेहसंमेलनाची सांगता उत्साहात केली.

## जुन्या पेन्शनसाठी कर्मचारी पुन्हा आक्रमक; घंटानाद, काळ्या फिती लावून...



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, अकोला :** जुनी सेवानिवृत्तिवेतन योजना लागू करण्याचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला असून त्यासाठी जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला. विविध मागण्यांसाठी सोमवारी घंटानाद आंदोलनासह काळ्याफिती लावून निषेध नोंदवण्यात आला. संघटनेने विविध मागण्यांसंदर्भात प्रशासन व शासनाला निवेदन दिले आहे. १ नोव्हेंबर २००५ नंतर रुजू झालेले अधिकारी, कर्मचाऱ्यांना जुनी सेवानिवृत्तिवेतन योजना लागू न करता नवीन अंशदायी योजना लागू केली. ती रद्द करण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांनी संपचे हत्यार उपसले. त्यानंतर शासनाने समिती गठित करून मुद्दा निकाली काढण्याचे आश्वासन दिले. मात्र, त्यावर हालचाली झाल्या नसल्याने कर्मचारी संघटनेने पुन्हा आक्रमक भूमिका घेतली.

जुनी सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करण्यासह गत चौथ्या, पाचव्या वेतन आयोगातील तफावत दूर करून कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत वाढ करण्यात यावी, पदोन्नतीस्तर कमी करून दोन टप्प्यानंतर तिसऱ्या टप्प्यावर वर्ग दोनमध्ये पदोन्नती देण्यात यावी, महाराष्ट्र विकास सेवा श्रेणी वर्ग दोनच्या नियमात सुधारणा करण्यात यावी, जिल्हा परिषद कर्मचारी आकृतीबंधामध्ये कामाचा वाढलेला व्याप लक्षात घेता सुधारणा करण्यात यावी, जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ च्या नियमात बदल करण्यात यावेत, परिचर व वाहन चालक या पदांवर भरती बंदचा आदेश शासनाने रद्द करावा व या ठिकाणी अनुकंपा तत्वावर नेमणुकीसाठी प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना प्राधान्याने नेमणुका द्याव्यात, जि.प.मध्ये काम करणाऱ्या परिचर व वाहन चालक या दोन्ही संवर्गातील कर्मचाऱ्यांना नियमानुसार गणवेशासाठी रोख रक्कम व धुलाई भत्ता शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे मंजूर करण्यात याव्या आदी मागण्यांसाठी आंदोलन छेडण्यात आले होते.

कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत शासनाकडे वारंवार पाठपुरावा केल्याचे जि.प. कर्मचारी संघटनेचे राज्य सहसचिव सुनील जानोरकर यांनी सांगितले. मात्र, अद्यापही मागण्या मंजूर झालेल्या नाहीत. त्यामुळे आता आंदोलन सुरु केले आहे.

पहिल्या टप्प्यात काळ्या फिती लावून व घंटानाद आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन टप्प्याटप्प्याने तीव्र करण्यात येणार असल्याचा इशारा संघटनेच्यावतीने देण्यात आला आहे. आंदोलनात गिरीश मोगरे, राजेश मालगे, गजानन उघडे, अंकुश पटेल, विनोद बढे, संतोष ताथोड, दिनेश काटे, अभिजित बन्नोरे, संजय उंबरकर, रामधन सावदेकर, कैलास मसने आदींसह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## हुल्लडबाज क्रिकेटप्रेमींचा अग्निशमन वाहनावर चढून धिंगाणा



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, नाशिक :** रविवारी चॅम्पियन्स चषक स्पर्धेतील अंतिम सामना भारताने जिंकल्यानंतर शहरात ठिकठिकाणी क्रिकेटप्रेमींनी रस्त्यावर उतरुन जल्लोष केला. कॉलेजरोड परिसरात विजयानंतर फोडण्यात आलेल्या फटाक्यांमुळे महाविद्यालय परिसरात आग लागली. आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाचे वाहन जात असताना कॉलेजरोडवर क्रिकेटप्रेमींच्या गर्दीमुळे वाहनाला पुढे जाता येईना. यावेळी काही हुल्लडबाजांनी वाहनावर चढून धिंगाणा घातला.

विशेष म्हणजे, इतके होऊनही ना अग्निशमन विभागाने हा प्रकार गंभीरतेने घेतला ना पोलिसांनी.

चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना जिंकल्यानंतर शहरात क्रिकेटप्रेमींच्या उत्साहाला उधाण आले. लोक आनंद साजरा करण्यासाठी रस्त्यावर उतरले. घराबाहेर पडत फटाक्यांची आतषबाजी केली. उडत्या चालीवरील गाण्यांवर काहींनी रस्त्यातच ठेका धरला. त्यामुळे काही ठिकाणी वाहतूक कोंडी झाली.

कॉलेज रोड परिसरातील चौकात तर गर्दीमुळे चालणेही मुश्कील झाले होते. गाण्याच्या ठेक्यावर तरूणाई नाचत असतांना काहींनी आतषबाजीला सुरुवात केली. भि.य.क्ष. महाविद्यालयालगत असलेल्या मोकळ्या मैदानात काही जळते फटाके पडले. वाळलेल्या गवताने त्यामुळे पेट घेतला. हा प्रकार परिसरातील लोकांच्या लक्षात येताचयी अग्निशमन विभागाला माहिती देण्यात आली. अग्निशमन विभागाचा बंब घटनास्थळाकडे निघाला असतांना त्यास कॉलेज रोडवरील गर्दीमुळे पुढे जाता येईना. गर्दीतील काही हुल्लडबाजांनी अग्निशमन वाहनावर चढून नाचण्यास सुरुवात केली. अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांना हुल्लडबाजांना वाहनावरुन उतरवितांना नाकीनऊ आले. यावेळी उपस्थित पोलीस या गोंधळात केवळ बघ्याच्या भूमिकेत राहिले.

अग्निशमनच्या कर्मचाऱ्यांनी हुल्लडबाजांना वाहनावरुन उतरविल्यानंतर वाहन घटनास्थळी दाखल झाले. वाहनास उशीर झाल्याने आग अधिक पसरली. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी काही मिनिटात आगीवर नियंत्रण मिळवले. मैदानातील गवतासह परिसरातील झाडांना आगीची झळ बसली. विशेष म्हणजे, कॉलेजरोडवर अग्निशमनच्या वाहनाबद्दल इतका धांगडधिंगा होऊनही अग्निशमन तसेच पोलीस यांच्याकडून हुल्लडबाजांविरूध्द कुठलीही कारवाई करण्यात न आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

## २०५० पर्यंत भारतातील २१.८ कोटी पुरुष आणि २३.१ कोटी महिला लठ्ठपणाच्या शिकार होणार...



२०५० पर्यंत भारतातील २१.८ कोटी पुरुष आणि २३.१ कोटी महिला लठ्ठपणाच्या शिकार असतील. एकूण ४४.९ कोटी किंवा लोकसंख्येच्या जवळजवळ एक तृतीयांश लोक लठ्ठपणानं त्रस्त असतील, असा अंदाज लॅन्सेटच्या एका नवीन अभ्यासात वर्तवण्यात आला आहे. जागतिक स्तरावर, २०५० पर्यंत सर्व प्रौढांपैकी अर्ध्याहून अधिक आणि मुले आणि किशोरवयीन मुलांपैकी एक तृतीयांश मुलं जास्त वजनाचे किंवा लठ्ठपणाचे बळी पडतील, असे अभ्यासात म्हटले आहे. चिंताजनक बाब म्हणजे तरुणांमध्ये, पुरुषांमध्ये जास्त वजन किंवा लठ्ठपणाचे प्रमाण १९९० मध्ये ०.४ कोटींवरून २०२१ मध्ये १.६८ कोटींवर पोहोचले आणि २०५० पर्यंत ते २.२७ कोटींवर पोहोचण्याचा अंदाज आहे. तरुण महिलांमध्ये ही संख्या १९९० मध्ये ०.३३ कोटी, २०२१ मध्ये १.३ कोटींवरून वाढली आहे आणि २०५० मध्ये ती १.६९ कोटींवर पोहोचण्याचा अंदाज आहे. पण, हा लठ्ठपणा का वाढत आहे? यावर काय उपाय करता येईल? या संदर्भात ओबेसिटी अँड मेटाबॉलिक सर्जरी सोसायटी ऑफ इंडियाच्या वैज्ञानिक समितीचे नेतृत्व करणाऱ्या डॉ. अपर्णा गोविल भास्कर यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सविस्तर माहिती दिली आहे.

**ही संख्या का महत्त्वाची आहे?**

२०२१ मध्ये जगातील लठ्ठ आणि जास्त वजन असलेल्या प्रौढांपैकी निम्मे प्रौढ लोक भारतासह आठ देशांमध्ये राहत होते हे लक्षात घेता ही वाढ चिंताजनक आहे. अभ्यासात असे म्हटले आहे की, कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये लठ्ठपणाचे वाढते प्रमाण – बालपणातील सततचे कुपोषण आणि संसर्गजन्य रोगांमुळे होत आहे. अभ्यासात पुढे म्हटले आहे की, बालपणातील कुपोषणामुळे प्रौढावस्थेत लठ्ठपणा येतो, यामुळे टाइप २ मधुमेह, हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी रोग आणि काही विशिष्ट कर्करोग यांसारख्या विकारांचा लवकर होण्याचा धोका वाढतो. दुसरीकडे, मुलांमध्येही वाढत्या लठ्ठपणाची शक्यता आहे. भारतात मुलांमध्ये लठ्ठपणा आणि जास्त वजनाचे प्रमाण १९९० मध्ये ०.४६ कोटींवरून २०२१ मध्ये १.३ कोटींवर पोहोचले आणि २०५० मध्ये ते १.६ कोटींपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. मुलींमध्ये १९९० मध्ये ते ०.४५ कोटींवरून २०२१ मध्ये १.२४ कोटींवर पोहोचले आहे आणि २०५० मध्ये ते १.४४ कोटींपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे, असे अभ्यासात म्हटले आहे.

**लठ्ठपणा का वाढत आहे?**

लठ्ठपणाच्या साथीचे एक प्रमुख कारण म्हणजे मीठ, साखर आणि चरबीयुक्त प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांच्या सेवनात वाढ. २००९ ते २०१९ दरम्यान भारत आणि व्हिएतनाममध्ये प्रक्रिया केलेले अन्न आणि पेयांच्या विक्रीत सर्वात मोठी वार्षिक वाढ दिसून आली, असे अभ्यासात म्हटले आहे.

ओबेसिटी अँड मेटाबॉलिक सर्जरी सोसायटी ऑफ इंडियाच्या वैज्ञानिक समितीचे नेतृत्व करणाऱ्या डॉ. अपर्णा गोविल भास्कर म्हणतात, वाढत्या शहरीकरणामुळे शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत, प्रवासाचा वेळ वाढला आहे आणि त्यामुळे कामाच्या ठिकाणीच राहावे लागत आहे. कॅलरीज जास्त असलेल्या, रिफाइंड कार्बोहायड्रेट्स, ट्रान्स फॅट्स आणि साखरेचे प्रमाण जास्त असलेल्या प्रक्रिया केलेल्या अन्नाकडे वळल्याने वजन वाढण्यास लक्षणीय हातभार लागला आहे. तसेच कामाशी संबंधित वाढता ताण, कमी झोप आणि मानसिक आरोग्य विकार हे लठ्ठपणाशी जोडले गेले आहेत.

**यावर काय उपाय करता येईल?**

लठ्ठपणा हा एक प्रमुख असंसर्गजन्य आजार (एनसीडी) म्हणून अधिकृतपणे ओळखला गेला पाहिजे आणि त्याचे प्रतिबंध आणि व्यवस्थापन भारताच्या सार्वजनिक आरोग्य धोरणांमध्ये समाविष्ट केले पाहिजे. लठ्ठपणा जागरूकता मोहिमा, कामाच्या ठिकाणी कल्याण कार्यक्रम, उपचारांची उपलब्धता, अन्नावरील कर इत्यादींचा समावेश असावा. लठ्ठपणाचे ट्रेंड, परिणाम आणि हस्तक्षेपांचा मागोवा घेण्यासाठी राष्ट्रीय नोंदणी स्थापन करणे महत्त्वाचे आहे, असे डॉ. भास्कर म्हणतात.

## सर्वांत मोठ्या पगडीचे मंगळवारी देहूत लोकार्पण...



**दि.१०, पिंपरी :** जगद्गुरू संत तुकाराम महाराज बीज सोहळ्याचे औचित्य साधून जगातील सर्वांत मोठ्या पगडीचे लोकार्पण मंगळवारी (१० मार्च) देहूत पार पडणार आहे. पगडीचा घेराव हा २२ फुटांचा असून, उंची ४ फूट आहे. या पगडीची 'वर्ल्ड रेकॉर्डस् इंडिया ॲन्ड जिनिअस'मध्ये नोंद होणार आहे. जगद्गुरू संत तुकाराम महाराज मुख्य मंदिरात सकाळी ११ वाजता हा सोहळा होणार आहे. या प्रसंगी वर्ल्ड रेकॉर्डस् इंडिया ॲन्ड जिनिअस फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी पवनकुमार सोलंकी, संत तुकाराम महाराज देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. पुरुषोत्तम मोरे उपस्थित राहणार आहेत. दिलीप सोनिगरा ज्वेलर्स यांनी याचे आयोजन केले आहे. दिलीप सोनिगरा म्हणाले, 'संत तुकाराम महाराज यांच्यावर नितांत श्रद्धा, प्रेम, स्नेह आहे. याच भावनेतून जगातील सर्वात मोठी पगडी तयार केली आहे. वर्ल्ड रेकॉर्डस् इंडिया ॲन्ड जिनिअस बुकमध्ये पगडीची नोंद होणार आहे. ही पगडी दर्शनासाठी सर्वांना खुली आहे'

**जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे चरित्र दीपस्तंभ प्रमाणे...**

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांचे चरित्र म्हणजे दीपस्तंभाप्रमाणे आहे, असे ज्ञानेश्वर महाराज कदम यांनी म्हटले आहे. तुकाराम महाराजांच्या सदेह वैकुंठगमनाला येत्या १६ मार्च रोजी अर्थात तुकाराम बीजेच्या दिवशी ३७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठगमन त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सव सोहळा साजरा होत आहे. या सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह आणि संगीत गाथा पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

# प्रमोद गांधी संकल्पित शृंगारतळीत भव्य आरोग्य शिबीर संपन्न

## एक समाज असंख्य रक्तदाते अभिनव उपक्रमाचे सर्वत्र कौतुक

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१०, गुहागर (रत्नागिरी) :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या १९ व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधत रविवार, दिनांक ०९ मार्च २०२५ रोजी भवानी सभागृह, पालपेणे रोड, शृंगारतळी येथे मनसेचे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांच्या सौजन्याने आयोजित केलेल्या रक्तदान शिबीर व आरोग्य तपासणी शिबिर असंख्य रक्तदाते यांच्या सामाजिक दायित्वातून उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला. सदर शिबिरात एक समाज असंख्य रक्तदाते अशी अभिनव संकल्पना राबवत नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, मोफत चष्मे वाटप आदी उपक्रम पार पडले.



जवळजवळ २०० रुग्णांनी नेत्र तपासणी सेवेचा लाभ घेतला. तर ७० रक्तदात्यांनी रक्तदानाचे सामाजिक दायित्व बजावलं. यावेळी उपक्रमाला योगदान देणाऱ्या आरोग्य सेवकांचा आरोग्य दूत म्हणून सन्मान करण्यात आला, सदर शिबिराला गुहागर तहसीलदार परीक्षित पाटील, गुहागर तालुका आरोग्य अधिकारी घनश्याम जांगीड, डॉ.राजेंद्र पवार, सुरेश सावंत आदी मान्यवरांनी सदिच्छा भेट देत उपक्रमाचे कौतुक केले.

गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला. सदर शिबीर यशस्वी होण्यासाठी मनसेचे उपजिल्हा प्रमुख विनोद जानवळकर,मनसे गुहागर तालुका अध्यक्ष सुनील हळदणकर, सुजित गांधी यांच्यासह गुहागर मनसेचे पदाधिकारी, मनसे सैनिक यांनी अथक परिश्रम घेतले. तर सदर शिबिरात सहभागी झालेल्या सर्व रक्तदाते, आरोग्य सेवकांचे तसेच सदर उपक्रमास योगदान देणाऱ्या नागरिकांचे मनसेचे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांनी आभार मानले आहेत.

# महाबळेश्वर येथे महिला दिन उत्साहात साजरा

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०९, महाबळेश्वर (सातारा) :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेच्या वतीने महिलांच्या सन्मानार्थ जागर नारी शक्तीचा २०२५ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम बाळासाहेब ठाकरे चौक येथून मुख्याधिकारी योगेश पाटील यांच्या हस्ते कार्यक्रम रॅलीचे उदघाटन करण्यात आले.

यामध्ये शहरातील विविध प्रभागातील महिलांच्या ११ गटांनी भारत देशातील विविध राज्यांच्या प्रामुख्याने महाराष्ट्राच्या विविध संस्कृतीच्या वेशभूषा व परंपरा याचे दर्शन घडविणारी भारतीय संस्कृतीचे दर्शन रॅली काढण्यात आली होती.

बस स्थानक मार्गे-नेताजी सुभाषचंद्र बोस चौक, डॉ.साबणे रोड-छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे समारोप पोलिस परेड ग्राउंड याठिकाणी झाला. यामध्ये ढोल-ताशा, लेझीम, मंगळागौर, महाराष्ट्राचे विविध



सण महिला वारक-यांची दिंडी इत्यादी संस्कृतीचे दर्शन रॅलीत झाले. रॅलीचे विशेष आकर्षण म्हणजे गिरिस्थान प्रशालेच्या मुलींचा छत्रपती शिवाजी महाराज यांचा देखावा चित्ररथ होता. तसेच सायंकाळी महिलांसाठी मनोरंजनात्मक लोकसंगीताचा नजराणा या विशेष लोकप्रिय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर महिला दिनाच्या कार्यक्रमात महाबळेश्वर शहरातील जास्तीत-जास्त महिलांनी सहभाग घेतला होता.

महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी योगेश पाटील, आबा ढोबळे तसेच नगरपालिका अधिकारी अमित माने, संतोष दड, सचिन कदम मुरलीधर धायगुडे व नगरपालिका कर्मचारी यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. सायंकाळी पोलीस परेड ग्राउंड येथे झालेल्या कार्यक्रम माजी महिला नगराध्यक्षा तसेच माजी नगरसेविकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

माजी नगराध्यक्षा विमल पारठे यांनी हा कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजीत केल्याबद्दल मुख्याधिकारी योगेश पाटील यांचे कौतुक केले. लोकसंगिताच्या कार्यक्रमास महिलांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती. प्रसिद्ध नृत्यांगना प्रज्ञा कोळी व त्यांच्या सहकाऱ्यांनी लोकसंगीताचा नजराणा सादर केला. सूत्रसंचलन शितल येवले यांनी केले.

# जागतिक महिला दिनानिमित्त योगसाधक महिलांचे योग आधारित नृत्य

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०९, सुपा (अहिल्यानगर) :** जागतिक महिला दिनानिमित्त केडगाव परिसरात राहणाऱ्या महिलांसाठी, महिलांच्या सन्मानार्थ महिलांचे स्थान सदैव उच्च ठेवण्यासाठी योग साधनेने तिची मानसिक व शारिरीक शक्ति सशक्त आणि स्थिर ठेवण्यासाठी कार्यरत 'कर्मयोगी योग स्टुडिओ' च्या संचालिका आहारतज्ञ ज्योती येणारे आणि मानवता फाऊंडेशन संचालित अ फर्स्ट स्टेप प्री प्रायमरी स्कूल च्या संचालिका मोनिका कुसळकर यांच्या संकल्पनेतून योगसाधक महिलांचे योग आधारित नृत्य व इतर सहभागी महिलांचे बॉलीवूड आधारित नृत्य यांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात सहभाग घेतलेल्या महिलांसाठी वेगवेगळे खेळ घेण्यात आले.

एक मिनिट प्रश्नमंजुषा आणि संगीत खुर्ची मध्ये कुसुम घुले, रत्नमाला भोर, रजनी तांदळे, सिद्धी तांदळे, सृष्टी येणारे, मीनाक्षी काठमोडे, अनुराधा येणारे, संगीता जाधव, मनीषा शिरसाट सीमा चंदन, दहिफळे, अश्विनी घोडके, रोशनी कवडीवाले, प्रियांका शिंगवी, विराज जायभाय, यांनी बक्षिसे जिंकली. लकी ड्रॉ मध्ये सृष्टी येणारे रोशनी कवडीवाले, प्रियांका शिंगवी,

यांनी बक्षिसे जिंकली. आहार तज्ञ ज्योती येणारे यांनी आहार आणि योग यांची सांगड घालून महिलांचे मानसिक



व शारीरिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी मार्गदर्शन केले, तर अ फर्स्ट स्टेप प्री प्रायमरी स्कूलच्या संचालिका मोनिका कुसळकर यांनी मुलांचे बालपण जपून हसत खेळत डिजिटल शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. इट्स फ्युजन यांच्यातर्फे सहभागी महिलांना महिला दिनानिमित्त आरोग्यासाठी पोषक आणि हलके असे ओट्स चे पॅकेट भेट देण्यात आले.

अमृता बरमेचा यांचे या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य लाभले कर्मयोगी योगा स्टुडिओ च्या संस्थापिका गायत्री गार्डे ह्या ही उपस्थिती होत्या. महिलांनीच महिलांसाठी आयोजित केलेल्या या कार्यक्रमात स्त्री शक्तीचा जागर करत महिलांनी आनंदाची लय लूट केली.

# फसवणूक करणाऱ्या आरोपींना पोलिसांनी केल्या जेरबंद...

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१०, कल्याण (ठाणे) :**

कोळसेवाडी पोलीस ठाणेचे हद्दीत दिनांक २६/०२/२०२५ रोजी दुपारी ०२:०५ वा.चे सुमारास फिर्यादी नामे विशाल दत्तु बोडके, वय २२ वर्षे, रा. बलराम बिल्डिंग,, रूम नं.५०२, द्वारका नगरी, संतोष नगर, कल्याण पुर्व यांचे तिसंगाव नाका येथील आर. के. बझार या सुपर मार्केटमध्ये दोन इसम येवुन त्यांनी फिर्यादी यांचे सुपर मार्केट मधुन किराणा सामान मधील ६२९३/-रू. किमंतीच्या वस्तु विकत घेतल्या व फिर्यादी याच्या भावाला ऑनलाईन बिल भरतो असे सांगुन त्यांनी सदरचे बिल अदा केलेबाबतचे बनावट फोन पे ॲपवर दाखवुन बिल पेड न करता फिर्यादी यांची फसवणुक केली म्हणुन कोळसेवाडी पोलीस ठाणे गु.रजि. नं.२१३/२०२५ भा.न्या.सं.२०२३ चे कलम ३१८(४), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर दाखल गुन्हयाचा वपोनि श्री गणेश न्हायदे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनिरी सिराज शेख व गुन्हे प्रकटीकरण पथकाने सपोनि दर्शन पाटील व त्यांचे पथकाने गुन्हयाचा तांत्रिक तपास करून सदर गुन्हयातील फसवणुक करून गेलेले आरोपीचे नामे १) पंकज गोपाळ पाटील, वय २२ वर्षे, रा.रूम नं.१२, साई सनम सोसायटी, साईनाथ नगर, ठाणे. २) अनिल अरूण कांबळे, वय २४ वर्षे, रा. गणेशवाडी, पाचपाखाडी,



ठाणे प. अशा दोन आरोपीना अटक करून त्यांचेकडे सखोल तपास करून कोळसेवाडी पोलीस ठाणे गुरजि.नं.२१३/२०२५ भा.न्या. सं.२०२३ चे कलम ३१८(४),३(५) प्रमाणे दाखल गुन्हयातील मुदद्देमाल व मानपाडा पो.स्टे.गु.रजि.नं.२५६/२०२५ भा.न्या. स.२०२३ चे कलम ३१८(४), ३(५) प्रमाणे दाखल गुन्हयातील मुदद्देमाल जप्त करून दोन गुन्हे उघडकीस आणले आहेत. आरोपीतांचे ताब्यातुन एकुण १६,४५५/- रू. किमंतीच्या किराणा माल व वस्तु व एकुण चार मोबाईल फोन असा मुदद्देमाल जप्त केला आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ३,( कल्याण ) अतुल झेंडे, व सहा. पोलीस आयुक्त कल्याण विभाग कल्याणजी घेटे यांचे मार्गदर्शनाखाली कोळसेवाडी पोलीस ठाणेचे वपोनिरी गणेश न्हायदे, पो. निरी प्रशासन नाईक यांचे सुचनेप्रमाणे सहा. पो निरी दर्शन पाटील, पोलीस उप निरीक्षक सिराज शेख, पोहवा १५३२ बोरसे, पोहवा १२२६ सांगळे, पोहवा ६२५६ कापडी, पोहवा ६५९६ जरग, पोहवा ६५४८ सांगळे, पोशि २६५६ सोनावळे, पोशि गिते यांचे पथकाने केलेली आहे.

# महाविद्यालयाच्या विकासात माजी विद्यार्थ्यांचे मोलाचे योगदान - सिताराम खिलारी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील ग्रामीण भागातील श्री ढोकेश्वर महाविद्यालयाच्या विकासात माजी विद्यार्थी व पालकांचे मोलाचे योगदान असल्याचे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे जेष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी यांनी केले. श्री ढोकेश्वर महाविद्यालयात आयोजित माजी विद्यार्थी व पालक मेळाव्यात बोलताना खिलारी म्हणाले की, श्री ढोकेश्वर महाविद्यालयाला नॅकची ब प्लस श्रेणी मिळालेली आहे. ए श्रेणी मिळवण्यासाठी माजी विद्यार्थी आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. महाविद्यालयात एम. कॉम. एम. एस्सी. बी. एस्सी. (संगणकशास्त्र) हे अभ्यासक्रम नव्याने सुरू झालेले आहेत. त्यामुळे टाकळी ढोकेश्वर परिसरातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची मोठी सोय झाली आहे. प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी विद्यार्थी, प्राध्यापक यांच्या सहकार्याने या महाविद्यालयाला यापुढील काळात ए श्रेणी नक्की मिळेल, अशी हमी दिली. याप्रसंगी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. हरेश शेळके, प्रसाद महाराज खिलारी, सरपंच अभिजित झावरे, प्रा. तुषार ठुबे यांनी मनोगतातून महाविद्यालयासठी ग्रंथ शिक्षण घेणाऱ्या गरिबी विद्यार्थ्यांसाठी आर्थिक मदत तसेच महाविद्यालय परिसरात झाडे लावण्याचे काम माजी विद्यार्थी करणार असल्याचे सांगितले. श्रावण गायकवाड यांनी महाविद्यालयाला यापुढील काळातही सहकार्य करू असे आश्वासन दिले. यावेळी राजेंद्र फडके यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास आजी- माजी विद्यार्थी, पालक व प्राध्यापक उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. लक्ष्मण कोठावळे यांनी केले तर आभार प्रा. संकेत ठाणगे यांनी मानले.

# थोडक्यात

## धनंजय शिंगाडे युवा प्रतिष्ठानच्या वतीने शिवचरित्रावरील पुस्तके देऊन महिला दिन साजरा

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०९, धाराशिव :** धाराशिव येथील धनंजय शिंगाडे युवा प्रतिष्ठानच्यावतीने आनंदनगर पोलीस स्टेशन येथे महिला दिनाचे औचित्य साधून शिवचरित्रावरील पुस्तके व पुष्प देऊन जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. शनिवार, दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी झालेल्या कार्यक्रमात अनेक महिलांना शिवचरित्रावर आधारित प्रोत्साहन देणार्या पुस्तकांचे पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. तसेच आनंदनगर पोलीस निरीक्षक खंडागळे यांचे ही देखील पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी आनंदनगर पोलीस स्टेशन येथे अहोरात्र नागरिकांना सेवा व संरक्षण पुरवविणार्या पोलीस दलातील माता-भगिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमास प्रतिष्ठानचे प्रसेनजित शिंगाडे, प्रीतम मुंडे, सम्राट वाघमारे, प्रशांत कांबळे, रोहित शिंगाडे, सुमित भोई, यशवंत शिंगाडे, गौरव धावारे, संजय थोरात, भूषण माने व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



## धाराशिव प्रशालेत जागतिक महिला दिन साजरा

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०९, धाराशिव :** आईमुळे मी शिकले. जे विद्यार्थी शिक्षण घेऊन नोकरी व्यवसायाला लागले. ते विद्यार्थी आजही कुठ भेटले तरी चर्चा करतात. परंतु जे विद्यार्थी शिकले नाहीत त्यांचे भेट जरी झाले तरी ते दूरून जातात त्यामुळे प्रत्येकाने शिक्षण घेतले पाहिजे फक्त नोकरीच्याच मागे न धावता व्यवसाय उद्योग उभा करावे, असे मत जयश्री भोसले यांनी व्यक्त केले. धाराशिव प्रशालेत दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी मुख्याध्यापक पंडित जाधव, सुवर्णा सोनवणे, दिपाली रोकडे, गौरी माने, झिनत पठाण, निलावती झोरे यांची उपस्थिती होती. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी मुख्याध्यापक पंडित जाधव यांनी जागतिक महिला दिनाचे महत्त्व विशद करताना देशासह जगभरात नावलौकीक मिळविलेल्या थोर महिलांच्या जीवनकार्याविषयी माहिती दिली. तसेच जगभरात स्वकर्तृत्त्वाने पुढे आलेल्या महिलांचा आदर्श विद्यार्थिनीनी घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. शाळेतील विद्यार्थीनिंनी आपल्या भाषणातून सावित्रीबाई यांचे शिक्षणाबद्दलचे महत्व सांगितले. तसेच प्रशालेतील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंच्या जीवनावर प्रकाश टाकणारे नाटिका देखील यावेळी सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन नंदकुमार रणदिवे यांनी केले. कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



## श्रीराम विद्यालयात जागतिक महिला दिन विविध उपक्रमानी साजरा

**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.०९, रेणापूर (लातूर) :** श्रीराम प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय रेणापूर येथे नेहरू युवा केंद्रा तर्फे जागतिक महिला दिन दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी विविध उपक्रमानी साजरा करण्यात आला. या प्रसंगी अध्यक्ष म्हणून रेणूका शिक्षण संस्थेचे संचालक अनिता भातीकरे तर व्यासपीठावर समाजातील समाजसेवी महिला नेहरू युवा केंद्राचे समन्वयक अविनाश दुमपल्ले, प्राचार्य सिध्देश्वर मामडगे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सतिष मोरे, पर्यवेक्षक अनिल कुटवाड, क्रिडा विभाग प्रमूख विवेक भातीकरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्वर स्वामी, प्रा. एल.आर शेवाळे यांची उपस्थिती होती. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करून शिवपार्वती बचत गटाच्या अध्यक्ष अनुराधा अकनगिरे, माधव बाग हॉस्पिटलच्या हिना देशमुख, ग्राम पंचायत अधिकारी रत्नमाला सूर्यवंशी, मीना चव्हाण, उद्योजिका अश्विनी सूरवसे या नारीरत्नाचा सत्कार करण्यात आला.



त्यांनंतर किशोरवयीन मुलींच्या कबड्डी स्पर्धा संपन्न झाल्या. यामध्ये श्रीराम विद्यालय रेणापूरचा संघ प्रथम, वीर हनुमान व्यायाम शाळेचा संघ द्वितिय तर प्रभात क्रिडा मंडळाचा संघ तृतीय आला. या विजेत्यांना नेहरू यूवा केंद्रातर्फे ट्रॉफी प्रदान करण्यात आल्या. या स्पर्धेचे पंच म्हणून सुरेखा बस्तापूरे, महानंदा माने, पुष्पा निकम यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनिता वेल्हाळे यांनी केले. प्राचार्य सिध्देश्वर मामडगे यांनी जागतिक महिला दिनाचे महत्व सांगितले. तर सुरेखा बस्तापूरे यांनी आभार मानले.

## माणूसकी फौंडेशन तर्फे जागतिक महिला दिन साजरा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, मुं.उपनगर :** दिनांक ०९ मार्च २०२५ रोजी स्था.जैन हॉल, तुळींज रोड, नालासोपारा येथे माणूसकी फौंडेशन तर्फे नारी शक्ती सन्मान पुरस्कार २०२५ यशस्वी पार पडला. संस्थेचे महिला अध्यक्ष ॲड.किरण म्हात्रे व सचिव ज्योतीताई तांबे, मनीषा खिलारे, रजनीताई गडा, अंध श्रद्धा निर्मूलन समितीच्या वंदना शिंदे, वंचित बहुजन पक्षाच्या नालासोपारा-विरारच्या अध्यक्षा गीता जाधव, स्नेहा जावळे, ॲड.निलम आंबोकर, मैत्री संस्थेचे अध्यक्ष सुरज भोईर, कवी व योगाचार्य संतोष खरदमोल, तेजस्विनी डोहाळे विजय गोडबोले, सुवर्णा सुभाष आंबोकर, संतोष भोईर, संतोष आंबेकर, सिम्मी लोखंडे, गीता डाबरे, डॉ. मालदेव यादी मान्यवर महिला उपस्थित होत्या. वंदना शिंदे नी चमत्कार मागे विज्ञान व चमत्कार करून व्यख्यान उत्कृष्ट व्याख्यान दिले. सर्व पुरस्कार प्राप्त महिलांचे खूप खूप अभिनंदन व आभार माणूसकी फौंडेशनचे अध्यक्ष घनश्याम आंबोकर यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती तांबे यांनी केले.